
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730



AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com


# AJANTA





AJANTA
PRAKASHAN

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | कृषी आणि कृषी उद्योगाची वाटचाल<br>**प्रा. डॉ. प्रतिभा काळमेघ** | ६०-६३ |
| १५ | आर्थिक कल्याणाच्या सिध्दांताचे चिकित्सक अध्ययन<br>**प्रा. डॉ. नारोगाव के. सोरे** | ६४-६८ |
| १६ | प्रिया तेंडूलकर यांची कथा : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी** | ६९-७१ |
| १७ | धर्मनिरपेक्षता आधुनिक विचार<br>**प्रा. संदीप तुंडूरवार** | ७२-७७ |
| १८ | राष्ट्रसंतांचा राष्ट्रवाद<br>**प्रा. अनिल जा. दौलतकार** | ७८-८१ |
| १९ | समाज परिवर्तनात सामाजिक माध्यमांची / प्रसार माध्यमांची भूमिका<br>**प्रा. डॉ. जयमाला लाडे** | ८२-८६ |
| २० | ग्रामगीतेतून प्रकटणारा विद्यार्थी विकास दृष्टीकोन<br>**प्रा. विवेक भिकाभाऊ कोल्हे**<br>**प्रा. डॉ. देवराव नामदेवराव राठोड** | ८७-८९ |
| २१ | साहित्य समाजशास्त्र<br>**प्रा. राहूल एस. खंडारे** | ९०-९४ |
| २२ | भारतीय लोकशाही आणि प्रादेशीकवाद<br>**सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव** | ९५-९८ |
| २३ | स्वातंत्र्योत्तार काळातील स्त्रियांची वाङमयीन चळवळ : स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. गणेश क. टाले** | ९९-१०३ |
| २४ | जंकफूडची वाढती लोकप्रियता व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. मनिषा मुलकलवार**<br>**डॉ. प्रमोद मुलकलवार** | १०४-११४ |
| २५ | भगवद्‌गीतेच्या १५ व्या अध्यायातील पुरुषोत्तम स्वरुप वर्णन - एक जीवन मूल्य<br>**प्रा. दर्शना तायडे (सायम)** | ११५-११८ |

# १६. प्रिया तेंडूलकर यांची कथा : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी**
मराठी विभाग प्रमुख, श्री बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.

मराठी कथा लेखिकामधील महत्वाच्या कथाकार म्हणून मराठी कथावाङःमयात प्रिया तेंडूलकरांचे विशेष स्थान आहे. 'ज्याचा त्याचा प्रश्न' (1987), 'जन्मलेल्या प्रत्येकाला' (1991), असंही (1996), 'जावे तिच्या वंशा' (2000) इ. असे त्यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत.

प्रिया तेंडूलकरयांनी कथेच्या माध्यमातून स्त्रियांचे दुःख, वेदना व विविध समस्यांना वाचा फोडण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या कथेचे विषय व आशय अर्थपूर्ण आहे. आपल्या कथेच्या माध्यमातून त्यांनी मानवी वृत्तीप्रवृत्तीवर प्रकाश टाकलेला आहे. स्त्रीजीवनातील विविध प्रसंगावर त्यांची कथा भाष्य करते.

प्रिया तेंडूलकर यांनी प्रौढ कुमारिका, घटस्फोटिता, परित्यक्ता यांच्या जीवनातील विविध समस्या अधोरेखीत केल्या. विविध समस्या या स्त्रियांवर लादल्या गेलेल्या आहेत. याची कबुली त्यांच्या कथेने दिली. स्त्री ही पुरूषप्रधान व्यवस्थेत सारखी भरडली जात आहे हे त्यांच्या कथेतून स्पष्ट होते. याबाबतीत 'वारे' 'जन्मलेल्या प्रत्येकाला' या कथेतील रेणुकाचे मनोमत बोलके आहे. ''त्यावेळी नानांच्या संकुचित, मर्यादित विचारसरणीची कीव आली वाटले होते., सातान्यात जन्माला येवून सातान्यातच सुरकुतलेले हे माझे वडील त्यांना ध्येय, महत्वाकांक्षा हे सारे कळणार तरी कसे ? बाईच्या जातीने माजघरात राहून रांधा, वाढा, उष्टी काढा, करीत मरायचे फार तर अहवेपणी संपायचे एवढीच इच्छा बाळगणाऱ्या नववारीत गुरफटलेल्या माईला मी नतद्रष्ट कार्टी वाटले तर त्यात तिची तरी काय चुक ? मी कुणी तरी होऊन दाखवेन. कुणीतरी म्हणजे कुणाची तरी बायको, कुणाची तरी आई याहीपेक्षा कुणीतरी मी म्हणून एक स्वतंत्र, कर्तृत्ववान, माझ्या हक्काची, माझ्या हिमतीची मी ! फक्त माझी, एकटीची''

प्रिया तेंडूलकरयांनी आपल्या कथेतून घटस्फोटीत, परित्यक्ता यांच्या जीवनातील विविध समस्यांना हात घातला आहे. 'अ–जन्मा' या कथेतील नायीकेची मनोवस्था फार बोलकी आहे. ''शरीराच्या रोमारोमातून मातृत्वाची एक विलक्षण उर्मी तिलाही न जुमानता तिच्या अस्तित्वाला गिळून गेली आणि ठरवले की हे द्यायचे. याला जन्मू द्यायचे. माझ्या ओटीपोटात उमलणाऱ्या या कोवळ्या, अश्राप जीवनाला फुलू द्यायचे की कुस्करायचे हे ठरवण्याचा हक्क फक्त मला आहे. ते सर्वस्वी माझे आहे. माझ्यावर अवलंबून आहे. कुणाला जन्म नाकारणारी मी कोण ?'' यावर कथानायक म्हणते '' ते मूळ माझं नाही. गेल्या वर्षभरात मी तुझ्याशी कसलाच संबंध ठेवलेला नाही. ज्याचं असेल त्याच्या गळ्यात मार ! आम्हाला फसवण्याचा प्रयत्न करू नकोस. मी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जगाला जाहीर करेन की हे पोर माझं नाही''

रूढी परंपरेने अनेक समस्या स्त्रियांवर लादल्या गेल्या याची जाणीव प्रिया तेंडूलकर यांच्या कथेने दिली स्त्री ही या व्यवस्थेत भरडली, चिरडली जाते. ''कुठल्याही प्रकारची पुर्वीची ओळख पाळख नसतांना केवळ जन्म, गोत्र आणि पत्रिक पाहून लग्ने जुळविली जातात. त्यामुळे नवविवाहीत स्त्री बाजारातून आणलेल्या एखाद्या नव्या वस्तुप्रमाणे

नवऱ्याच्या घरी दाखल होते. नववधू ही लग्नपूर्वी बापाच्या घरी लहानाची मोठी झालेली असते. त्यात तिचा स्वभाव तिच्या आवडी निवडी, रूची–अभिरूची घडलेली असते. तिचे म्हणून एक मानसिक विश्व फुललेले असते. या सर्वांवर एक मोठा काळा ब्रश घेऊन फुली मारावी. त्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा चेहरा–मोहरा पुसुन टाकला तसा व्यवहार तिच्या वाट्याला येतो.'' स्त्री जीवनातील अनेक समस्यांची प्रिया तेंडूलकरयांनी खंत व्यक्त केली आहे.

''मलगनफ'' या कथेतील नायीकेचे अनिताचे नाव बदलून जयरामला षोभेल म्हणून जानकी ठेवले जाते नको असलेल्या रूढी, परंपरा तिच्यावर लादल्या जातात. विविध बाजूने होणारी स्त्री जीवनाची कोंडी प्रिया तेंडूलकरयांनी अधोरेखीत केली आहे.

स्त्री ही लग्नानंतर आपल्या हक्काच्या घरी आल्या नंतर तिच्या वाट्याला येणारे दुःख, त्रास, वेदना ही अनेक कथांमधून मांडलेल्या आहेत. पत्नी म्हणून येणाऱ्या स्त्रीला आधार देण्याचे काम तिच्या पतीचे असते. परंतु हाच तिचा जीवनसाथी तिला दुर्लक्षीत करतो, त्रास देतो. षारिरीक मानसिक छळ करतो, आपल्या पत्नीशी क्रूरपणे वागतो प्रसंगी तिला मारहानही करतो. 'सॉरी फॉर द लास्ट नाईट'' मधील सुमा ही आपले करीअर पतीच्या सांगण्यावरून सोडून देते व जीवनात दुःख ओढवून घेते. 'जन्मलेल्या प्रत्येकाला' या कथेतील नायीका पतीच्या व्यसनाला कंटाळून माहेरी निघून जाते.

पती–पत्नीमधील संबंधातून विकृत झालेले नातेसबंध संपुष्टात येते व त्यातून घटस्फोट घेतला जातो स्त्रीलाच संकटाचा सामना करावा लागतो. ''अंघोळ'', अ–जन्मा', 'लग्नसंपल्यावर', 'नवा गडी', तिच्या लग्नाचा बोध यासारख्या कथांमधून घटस्फोटीत स्त्रीच्या जीवनातील व्यथा वेंदनांना वाचा फोडलेली आहे.

'नवा गडी' मधील ही पुनर्विवाहाचा विचार करते तिला एक मुलगाही असते. या कथेतून स्त्री पुनर्विवाहावर लेखिकेने भाष्य केले आहे. तसेच 'लेजर', तुकडे नकटीच्या लग्नाला' या कथेतून प्रौढ कुमारिकांच्या प्रश्नांची उकल केलेली आहे. 'फर्टिलीटी क्लिनिक' मधील 'तनुजा' ही डॉक्टर आहे. ती सारे उपचार करते षेवटी उपचारासाठी विदेशात जाते. तिच्या मनाची तडफड, घुसमट या कथेतून लेखिकेने चित्रित केली. त्यांच्या काही कथांमधून 'आई' ही व्यक्तीरेखा त्यांनी साकारलेली आहे. 'जन्मलेल्या प्रत्येकाला', 'अनुची आई', 'अम्मा', 'इडियट बॉक्स', 'नवा गडी', 'लग्न' या कथातून आईची भूमिका व तिची वेगवेगळी रूपे, प्रिया तेंडूलकर यांनी साकारलेली आहे. डॉ. सुमन पुलावळे म्हणतात त्या प्रमाणे, ''प्रिया तेंडूलकर यांनी आपल्या कथातून केवळ स्त्रीवादी कथा लेखन करून स्त्रीवादाला बळकटीच फक्त दिली नाही तर स्त्रीवादाची कक्षा ओलांडून समाजशास्त्रीय दृष्टीने त्यांच्या कथांची दखल घेण्यास भाग पाडणारी व समाजशास्त्रीय सिद्धांताना आव्हान देणारी कथा लिहिली आहे'' अशा प्रकारे अनेक सामाजिक प्रश्नांची उकल त्यांनी आपल्या कथेच्या माध्यमातून केलेली आहे.

प्रिया तेंदूलकरानी स्त्रियांचे मनोविश्व, ताणतणाव अधोरेखीत करणाऱ्या कथा लिहून स्त्री जीवनाची होणारी कोंडी अधोरेखीत केली. स्त्री मनाची दखल पुरूषी व्यवस्थेत कधीच घेतली जात नाही ही खंत कथेतून व्यक्त झाली. त्यांच्या कथेतून 'विवाहसंस्था', विवाहव्यवस्थेची बदलेली चौकट अधोरेखीत झाली. तसेच त्यांनी अनेक कथांमधून सामाजिक रूढी प्रथा, परंपरेवर भाष्य केलेले आहे.

## समारोप

प्रिया तेंडूलकर या मराठी साहित्यात स्त्रीवादी लेखन करणाऱ्या कथा लेखिका आहे. घटस्फोटीत स्त्रियांचे प्रश्न कथेच्या माध्यमातून त्यांनी अधोरेखीत केले आहे. परित्यक्ता, प्रौढ कुमारिका यांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रिया तेंडूलकर यांनी केले आहे. तसेच परंपरेने लादलेली बंधने झुगारून देणारी स्त्री त्यांनी कथेच्या माध्यमातून अधोरेखीत केली आहे. त्याचप्रमाणे कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्थेच्या दिखाऊ वृत्तीवरही त्यांची कथा भाष्य करते. केवळ स्त्रीवादी भूमिकेतून त्यांनी कथा लेखन केलेले नसून त्यांच्या कथेला समाजशास्त्रीय पार्श्वभूमीही लाभलेली आहे. त्यांची कथा स्त्रीवादाची पुरस्कार करणारी आहे. स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार व विज्ञानयुगात विज्ञानाचा वापर करून होणारा अत्याचारही त्यांनी चित्रित केला.

स्त्रियांना कुटूंबात करावी लागणारी तडजोड, तिच्या वाट्याला येणारे दुःख, यातना त्यांनी मुखर केल्या समाजव्यवस्थेतील अनेक प्रश्नांवर प्रिया तेंडूलकर यांची कथा प्रकाश टाकते.

## संदर्भग्रंथ


- डॉ. सुभाष पुलावळे : मराठी कथा परंपरा आणि स्वरूपविशेष (चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद)
- प्रिया तेंडूलकरः जन्मलेल्या प्रत्येकाला .... (राजहंस प्रकाशन, पुणे)
- प्रिया तेंडूलकरः असंही (डिंपल पब्लिकेशन, ठाणे)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

# AJANTA

ISSN 2277 - 5730

Volume - VIII, Issue - I, January - March - 2019

Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी

As a Recognition of the Publication of the Paper Entitled

प्रिया तेंडूलकर यांची कथा : एक दृष्टिक्षेप

Editor : Vinay S. Hatole

Ajanta Prakashan,
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com